KRC
58

॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Knowledge Resource Center www.srtmun.ac.in

Phone : (02462) 215246 E-mail- krc@srtmun.ac.in

**ग्रंथ परीक्षण स्पर्धा**

## :: परिपत्रक ::

दि.१९ जून २०२६ रोजी राष्ट्रीय वाचन दिनाचे औचित्य साधून प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलातील संशोधक व विद्यार्थ्यांना खुली असलेली ग्रंथ परीक्षण स्पर्धा १२ जून २०२६ रोजी ज्ञान स्रोत केंद्रात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे नियम व अटी खालीलप्रमाणे असतील.

१ विद्यापीठाच्या नांदेड येथील ज्ञानतीर्थ परिसरात कोणत्याही संकुलात /संशोधन केंद्रात प्रवेश घेतलेल्या संशोधक, विद्यार्थ्यास या स्पर्धेत भाग घेता येईल.

२ स्पर्धेसाठी पूर्व नोंदणी करणे अनिवार्य असेल. नोंदणी श्री. विठ्ठल मोरे यांचेकडे कक्ष १०२, ज्ञान स्रोत केंद्र येथे कार्यालयीन वेळेत करता येईल.

३ ग्रंथ परीक्षण लेखन स्पर्धा दि. १२ जून २०२६ रोजी ज्ञान स्रोत केंद्रात आयोजित केली जाईल.

४ ग्रंथ परीक्षण लेखनासाठी एका तासाचा वेळ दिला जाईल.किमान २०० शब्द लेखन केलेले ग्रंथ परीक्षणच स्पर्धेसाठी पात्र राहील.

५ परीक्षकाकडून हे निबंध तपासून घेऊन त्यातून सर्वप्रथम आलेल्या निबंध लेखकास रुपये ११००, द्वितीय रुपये ७५० व तृतीय रुपये ५०० अशी तीन बक्षिसे व प्रमाणपत्र दिले जाईल.

६ किमान ४०% गुणप्राप्त पात्र स्पर्धक संशोधक व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात येईल.

७ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतेही प्रवेश शुल्क असणार नाही. तसेच प्रवासखर्च किंवा कोणताही अन्य भत्ता देय असणार नाही.

८ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अधिकृत व अद्ययावत मुद्रित ओळखपत्र दाखविणे अनिवार्य असेल.

९ वरील नियमात, स्पर्धा आयोजनात बदल करण्याचा, रद्द करण्याचा, निर्णयाचा हक्क राखून ठेवला आहे.

१० केवळ इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतील ग्रंथाचे परिक्षण करून ग्रंथ ज्या भाषेत असेल त्याच भाषेत ग्रंथ परीक्षण लेखन करणे अनिवार्य राहील.

११ ग्रंथ परीक्षण लेखन करण्यासाठी कागद पुरविला जाईल.

१२ स्पर्धे दरम्यान भ्रमणध्वनी सोबत ठेऊ नये. कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास सदर स्पर्धकास स्पर्धेतून बाद करण्यात येईल.

वेळ: सकाळी ११ ते १२ मध्यान्ह
स्थळ: कक्ष क्रमांक १०६ ज्ञान स्रोत केंद्र
"ज्ञानतीर्थ", परिसर विष्णुपुरी, नांदेड.-४३१६०६.
जा.क्र.ज्ञा.स्रो.कें/२०२६-२०२७/265
दिनांक:०८ जून २०२६

संचालक
08/06/2026
ज्ञान स्रोत केंद्र

**DIRECTOR**
Knowledge Resource Centre
Swami Ramanand Teerth
Marathwada University,Nanded

प्रत माहितीस्तव:

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२. मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३. मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:-

१. मा. संचालक, सर्व संकुल, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.

२. सिस्टीम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करावे.